Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

| रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ | वर्ष १ | अंक १४२ | पाने ४ | Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

**बावीत अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगते निमित्त रक्तदान शिबिर!**

(पान २ वर)



✓ » Selected

## मुंबईतील सर्वात महागडा गणपती

नागपूर: अवघ्या महाराष्ट्राचे लाडके दैवत असलेल्या गणरायाच्या आगमनाचा दिवस अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. येत्या 14 सप्टेंबरला गणेश चतुर्थीला लाडका बाप्पा घरोघरी आणि सार्वजनिक गणपती मंडळांच्या मंडपांमध्ये विराजमान होईल. मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव (Ganesh Utsav 2026) हा कायमच अनेकांच्या चर्चेचा आणि कुतूहलाचा विषय राहिला आहे. मुंबईतील उंच गणेशमूर्ती पाहण्यासाठी राज्यभरातून भाविक येतात. यंदाही मुंबईतील मानाच्या गणेश मंडळांसोबत अनेक सार्वजनिक गणेश मंडळांचे गणपती लक्ष वेधून घेताना दिसत आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये 'साकीनाक्याचा महाराजा' (Sakinakyahca Maharaja) या नावाचा मुंबईतील गणेश मंडळांमध्ये बोलबाला होऊ लागला आहे. यंदाही 'साकीनाक्याचा महाराजा' मोठ्याप्रमाणावर चर्चेचा विषय ठरण्याची शक्यता आहे.

### अंतर्गत राजकारणाला नवे वळण, तटकरेंनी साधला डाव, गोगावले विरोधक राष्ट्रवादीच्या गोटात!

# सेना ठाकरे गटाला धक्का, पण झाला शिंदे गटाचा गेम

## महाडचे ठाकरे गटाचे समन्वयक ओझर्डे यांचा पदाधिकारी व समर्थकांसह राष्ट्रवादीत प्रवेश

जन सम्राट टाईम्स

**रायगड। शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला बसणाऱ्या राजकीय धक्क्यांची मालिका सुरूच असताना रायगडमधून पुन्हा एक मोठी राजकीय घडामोड समोर आली आहे. महाड विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना ठाकरे गटाचे समन्वयक सोमनाथ ओझर्डे यांनी आपल्या पदाधिकारी आणि सहकाऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनील तटकरे यांनी ओझर्डे यांचे पक्षात स्वागत केले.ओझर्डे यांची ओळख रायगडचे पालकमंत्री आणि महाडचे शिवसेना आमदार भरत गोगावले यांचे कट्टर राजकीय विरोधक अशी असल्याने या पक्षप्रवेशाची राजकीय वर्तुळात विशेष चर्चा रंगली आहे. त्यामुळे हा प्रवेश ठाकरे गटासाठी धक्का मानला जात असतानाच, महाडमधील बदलत्या समीकरणांचा थेट परिणाम शिंदे गटावरही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महाड विधानसभा मतदारसंघात भरत गोगावले यांचे राजकीय वर्चस्व आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या कट्टर विरोधकाला आपल्या गोटात घेऊन सुनील तटकरे यांनी महाडमध्ये



राष्ट्रवादीची राजकीय ताकद वाढविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकल्याची चर्चा सुरू झाली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्रिपद शिवसेनेकडे गेल्यानंतर महायुतीतील सर्व काही सुरळीत असल्याचे चित्र असले तरी स्थानिक पातळीवरील राजकीय संघर्ष आणि कुरघोड्या कायम असल्याचे या पक्षप्रवेशातून दिसून येत असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. रायगडच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्यातील राजकीय स्पर्धा यापूर्वीही अनेकदा समोर आली आहे. शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी हे तटकरे कुटुंबीयांवर सातत्याने टीका करत असल्याने दोन्ही पक्षांतील स्थानिक पातळीवरील राजकीय संघर्ष चर्चेत राहिला आहे. आता सोमनाथ ओझर्डे यांना राष्ट्रवादीत प्रवेश देत सुनील तटकरे यांनी महाडमध्ये नवी राजकीय मोर्चेबांधणी सुरू केल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, ज्या नेत्याचा थेट संघर्ष भरत गोगावले यांच्याशी राहिला आहे, त्यांनाच राष्ट्रवादीच्या गोटात स्थान देण्यात आल्याने महाडच्या राजकारणात आगामी काळात तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सोमनाथ ओझर्डे यांच्या राष्ट्रवादी प्रवेशामुळे शिवसेना ठाकरे गटाला निश्चितच धक्का बसला आहे. मात्र, या प्रवेशाचे राजकीय परिणाम केवळ ठाकरे गटापुरते मर्यादित राहतील का, हा प्रश्नही उपस्थित झाला आहे. ठाकरे गटातून बाहेर पडलेला आणि भरत गोगावले यांचा राजकीय विरोधक म्हणून ओळख असलेला नेता राष्ट्रवादीच्या गोटात गेल्याने महाडमध्ये शिंदे गटाच्या विरोधातील राजकीय समीकरणांना बळ मिळू शकते, अशी चर्चा सुरू आहे. त्यामुळे एका पक्षाला धक्का देताना दुसऱ्या मित्रपक्षाच्या मतदारसंघात आपली ताकद वाढविण्याचा राष्ट्रवादीचा हा डाव असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

### 'ऑपरेशन टायगर'नंतर; हालचालींना वेग

विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीतील घटक पक्षांकडे विविध नेत्यांचे पक्षप्रवेश सुरू आहेत. शिवसेना ठाकरे गटाला यापूर्वीही मोठे धक्के बसले असून, राज्यातील राजकीय समीकरणांमध्ये सातत्याने बदल होत आहेत. त्यातच 'ऑपरेशन टायगर'नंतर शिवसेना ठाकरे गटाच्या खासदारांच्या पक्षांतराची चर्चा झाली होती. राष्ट्रवादीच्या गोटात गेल्याने ठाकरे गटाची संघटनात्मक ताकद कमी होणार असली, तरी त्याच वेळी महाडमध्ये शिंदे गटासमोर राष्ट्रवादीचे नवे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.

## अखेर मुख्यमंत्र्यांनी तोडगा काढला; १७ दिवसांनी आदिवासी विद्यार्थ्यांचे उपोषण मागे

### 'वर्षा'वरील बैठकीत मागण्यांवर सकारात्मक निर्णय; मेस सुविधा सुरू करण्यास मान्यता

जन सम्राट टाईम्स

**पुणे| प्रतिनिधी:** ] पुण्यातील मांजरी येथे गेल्या १७ दिवसांपासून उपोषण करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला अखेर यश आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आंदोलकांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले उपोषण मागे घेतले. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या हस्ते ज्यूस प्राशन करून आंदोलकांनी उपोषण सोडले. गेल्या १७ दिवसांपासून मांजरी येथे आदिवासी समाजातील विद्यार्थी विविध मागण्यांसाठी आंदोलन करत होते. यापूर्वी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी आंदोलकांची भेट घेऊन चर्चा करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याची भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली होती. 'वर्षा'वर मुख्यमंत्र्यांसोबत महत्त्वाची बैठक शनिवारी सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आंदोलकांच्या शिष्टमंडळासोबत मुंबईतील 'वर्षा' निवासस्थानी महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर राज्य सरकारकडून काही मागण्यांबाबत शासन निर्णय (जीआर) काढण्यात आले. हे शासन निर्णय घेऊन आदिवासी विकास मंत्री अशोक उईके आंदोलनस्थळी पोहोचले. त्यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करून सरकारच्या निर्णयांची माहिती दिली. त्यानंतर आंदोलकांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेत ज्यूस प्राशन करून उपोषण सोडले. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी 'मेस' सुविधा आंदोलनातील महत्त्वाच्या मागण्यांपैकी एक असलेल्या भोजन व्यवस्थेबाबत सरकारने निर्णय घेतला आहे. आदिवासी विकास विभागाच्या शासकीय वसतिगृहांमध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजनासाठी मिळणारी डीबीटी योजना रद्द करून 'मेस' सुविधा सुरू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. संबंधित अपर आयुक्तांना पुढील तीन महिन्यांत भोजनाचा ठेका देण्याची कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भोजन व्यवस्थेचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा आहे. सेंट्रल किचन पद्धतीबाबतही निर्णय विद्यार्थ्यांनी भोजन व्यवस्थेतील अडचणींचा मुद्दा आंदोलनादरम्यान उपस्थित केला होता.

## राज्यातील आणखी एक परीक्षा रद्द

जन सम्राट टाईम्स

**मुंबई| प्रतिनिधी:** मुंबई उच्च न्यायालयाकडून 16 ऑगस्ट या दिवशी लिपिक पदासाठी टंकलेखन परीक्षा ऑनलाइन पद्धतीनं राज्यभरात घेण्यात आली होती. मात्र, या परीक्षेमध्ये मोठा गोंधळ झाला, अनेक ठिकाणी तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नव्हती. तांत्रिक अडचणीमुळं संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केलं होतं. विद्यार्थ्यांनी त्यांच्या समस्या मांडल्यानंतर सीजेपीचे अभिजीत दीपके यांनी परीक्षा देणाऱ्या उमेदवारांसोबत छत्रपती संभाजीनगरला ठिय्या आंदोलन केलं होतं. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी देखील पाठपुरावा केला होता. अखेर, मुंबई उच्च न्यायालयानं 16 ऑगस्टची ऑनलाइन पद्धतीनं घेण्यात आलेली क्लार्क टंकलेखन चाचणी रद्द केली आहे. परीक्षेची नवी तारीख नंतर जाहीर केली जाईल, असं कळवण्यात आलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या क्लार्क म्हणजेच लेखनिक पदासाठी उमेदवारांना ऑनलाइन टंकलेखन चाचणी यशस्वी होणं आवश्यक होतं. मात्र, परीक्षा केंद्रावरील विविध अडचणींमुळं आणि इतर अडचणींमुळं म्हणजेच सर्व्हर डाऊन होणे, कीबोर्ड व्यवस्थित न चालणे



अशा समस्या विद्यार्थ्यांना आल्या होत्या. यानंतर विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीनगर, कल्याण, वाशिम, हिंगोली यासह विविध ठिकाणी अडचणी आल्याचं सांगितलं होतं. अखेर मुंबई हायकोर्टाकडून 16 ऑगस्ट रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाइन टायपिंग टेस्ट परीक्षेला रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षेची तारीख लवकरच संकेतस्थळावर कळवली जाईल असं सांगण्यात आला आहे. टायपिंग टेस्ट रद्द करण्याचा निर्णय न्यायालय प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयाचं स्वागत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केलं आहे. उच्च न्यायालयाच्या लिपिक भरतीसाठी घेण्यात आलेल्या टायपिंगच्या परीक्षेत मोठ्या प्रमाणात गोंधळ झाल्याचं निदर्शनास आल्यानंतर उच्च न्यायालयाचे महानिबंधक मुनगंटे साहेब आणि महाधिवक्ता मिलिंद साठे साहेब यांची भेट घेऊन त्यांच्याकडं संबंधित परीक्षेची टायपिंग टेस्ट रद्द करण्याची विनंती केली होती. त्यानुसार 16 ऑगस्ट रोजी घेण्यात आलेली टायपिंग टेस्ट रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## आम्हाला दवाखान्यात जावं लागलं

मुंबई : नेपाळच्या (Nepal Flood) महाप्रलयाचे फोटो आणि व्हिडिओ पाहून अनेकांच्या काळजाचा ठोका चुकल्याशिवाय राहणार नाही. मात्र, या जीवघेण्या महाप्रलयातही काहींना जीवदान मिळालंय. त्यामध्ये, भारतीय, आपल्या महाराष्ट्रातील 37 पर्यटक भाविकांचाही असाच जीवन-मरणाचा किस्सा आहे. कारण, त्यांच्या ग्रुपमधील 2 पर्यटकांना त्रास होत असल्याने रुग्णालयात घेऊन जावे लागल्यानेच ते पर्यटक बचावले, अन्यथा महाप्रलयाच्या तडाख्यात तेही सापडले असते, अशी माहिती मुंबई (Mumbai) विमानतळावर येताच या पर्यटकांनी (Tourist) दिली. आमच्याकडे दोन रुग्ण होते, दोघांनाही ऑक्सिजनचा मोठा त्रास होत होता.

## खडसेंच्या अमृत महोत्सवाला राजकीय दिग्गजांची मांदियाळी!

जन सम्राट टाईम्स

**मुक्ताईनगर | प्रतिनिधी:** राज्याचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री तथा आमदार एकनाथराव खडसे (नाथाभाऊ) यांच्या अमृत महोत्सवी ७५व्या वर्षात पदार्पणानिमित्त श्रीक्षेत्र कोथळी येथे सुरू असलेल्या धार्मिक व सामाजिक सोहळ्याला आता राजकीय रंग चढला आहे. आज रविवार, ३० ऑगस्ट रोजी होणाऱ्या मुख्य अभीष्टचिंतन सोहळ्यास राज्यातील विविध राजकीय पक्षांतील दिग्गज नेते एकाच व्यासपीठावर उपस्थित राहणार असल्याने या कार्यक्रमाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. श्री संत मुक्ताई जुने मंदिर परिसरात अमृत महोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह, संगीत श्री संत



मुक्ताई चरित्र आणि संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सुरू आहे. या धार्मिक कार्यक्रमांमुळे कोथळी परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला असून, त्याचवेळी विविध राजकीय विचारसरणींचे नेते खडसेंना शुभेच्छा देण्यासाठी एकत्र येणार असल्याने सोहळ्याला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. चंद्रकांत पाटील यांची कोथळीत भेट मुख्य सोहळ्याच्या पूर्वसंध्येला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवार, २९ ऑगस्ट रोजी सकाळी कोथळी येथे उपस्थित राहून आमदार एकनाथराव खडसे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी खडसे यांना अमृत महोत्सवी वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच श्री संत मुक्ताई मंदिरात दर्शन घेतले. अनेक पक्षांचे दिग्गज एकाच व्यासपीठावर रविवारी होणाऱ्या मुख्य अभीष्टचिंतन सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार, भाजपचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर, शेकापचे अध्यक्ष जयंत पाटील आणि याशिवाय पालकमंत्री गुलाबराव पाटील, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि कामगार मंत्री आकाश फुंडकर हेही उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री राजेश टोपे, राजेंद्र शिंगणे, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी मंत्री अनिल देशमुख, खासदार अमोल कोल्हे, खासदार निलेश लंके, आमदार चैनसुख संचेती, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि मध्य प्रदेशच्या माजी मंत्री अर्चना चिटणीस यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरही या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. विविध राजकीय पक्षांचे नेते आणि वेगवेगळ्या विचारधारांचे प्रतिनिधी एकाच व्यासपीठावर येणार असल्याने खडसेंच्या अमृत महोत्सवाला केवळ कौटुंबिक अथवा सामाजिक कार्यक्रमाचे स्वरूप न राहता त्याला व्यापक राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

## समृद्धी महामार्गावर 31 ऑगस्टपासून ब्लॉक; प्रवासाचे नियोजन करा

### सिन्नर-भरवीर आणि भरवीर-इगतपुरी दरम्यान टप्प्याटप्प्याने वाहतूक बंद

जन सम्राट टाईम्स

**नाशिक | प्रतिनिधी:** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी प्रशासनाकडून महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली आहे. इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम (ITMS) अंतर्गत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी गॅन्ट्री बसविण्याचे काम करण्यात येणार असून, त्यासाठी ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान सिन्नर इंटरचेंज ते इगतपुरी इंटरचेंज या मार्गावर टप्प्याटप्प्याने वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. महामार्ग पोलिसांकडून प्राप्त परवानगीनुसार संबंधित कालावधीत ठराविक वेळेस



दोन्ही दिशेची वाहतूक काही काळासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे समृद्धी महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी ब्लॉकची वेळ लक्षात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. ITMS म्हणजे नेमके काय? समृद्धी महामार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी करणे, वाहनांचा वेग नियंत्रित करणे आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने INTELLIGENT TRAFFIC MANAGEMENT SYSTEM (ITMS) कार्यान्वित करण्यात येत आहे. या प्रणालीमध्ये अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे, वाहनांचा वेग मोजणारे कॅमेरे आणि स्वयंचलित चलन प्रणाली यांसारख्या सुविधांचा समावेश आहे. महामार्गावर उभारण्यात येणारी गॅन्ट्री ही या अत्याधुनिक कॅमेरे व उपकरणांना आधार देणारी मोठी लोखंडी संरचना असते. गॅन्ट्री बसविताना क्रेन तसेच मोठ्या यंत्रसामुग्रीचा वापर केला जाणार असल्याने वाहनचालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित वेळेत वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. प्रवाशांनी वेळेचे नियोजन करावे वाहतूक ब्लॉकच्या काळात वाहनचालकांना काही काळ प्रतीक्षा करावी लागू शकते. त्यामुळे प्रवाशांनी संबंधित वेळापत्रक लक्षात घेऊन आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. ब्लॉकच्या वेळेत वाहतूक कोंडीत अडकणे टाळण्यासाठी शक्य असल्यास एक तास आधी किंवा एक तास उशिरा प्रवास सुरू करावा, तसेच महामार्गावरील वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. समृद्धी महामार्गावरील सर्व प्रवाशांनी या कालावधीतील वाहतूक ब्लॉकची वेळ लक्षात घेऊन पुरेसे नियोजन करूनच प्रवास करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी प्रशासनाकडून महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली आहे. ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान सिन्नर इंटरचेंज ते इगतपुरी इंटरचेंज या मार्गावर टप्प्याटप्प्याने वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे.

वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज
दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...
डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!
- तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
- समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
- तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत
- पोहोचवायच्या आहेत का?
मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत
अनुभव असो वा नसो
– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा
डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध
तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ

संपर्क करा (Call / WhatsApp)
+91 93254 87889 / 9270187889
- संपादक -
मुकुंदराव शामराव नंन्नवरे
ईमेल : Jansamrattimes@gmail.com -
वेबसाईट : https://jansamrattimes.in
आजच संपर्क करा...
तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!

# अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाला विरोध; लोकसंघर्ष समितीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

## ५९ जातींच्या प्रतिनिधींची मते जाणून घेतली नसल्याचा समितीचा दावा;

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे प्रस्तावित उपवर्गीकरण करू नये, अशी मागणी अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी लोकसंघर्ष समिती, जळगाव जिल्हा यांच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याच्या प्रक्रियेत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यासंदर्भात राज्य सरकारने निवृत्त न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून अहवाल मागविल्याचा उल्लेखही करण्यात आला आहे. "५९ जातींच्या प्रतिनिधींची मते घेतली नाहीत" बदर समितीने अहवाल तयार करताना अनुसूचित जाती प्रवर्गातील ५९ जातींच्या प्रतिनिधींची मते जाणून घेतली नसल्याचा दावा समितीने निवेदनातून केला आहे. त्यामुळे संबंधित समाजघटकांचा पुरेसा सहभाग न घेता तयार करण्यात आलेल्या अहवालाच्या आधारे उपवर्गीकरण करणे अन्यायकारक ठरेल, अशी भूमिका लोकसंघर्ष समितीने मांडली आहे. अद्ययावत लोकसंख्येच्या आकडेवारीचा मुद्दा अनुसूचित जातींच्या लोकसंख्येबाबतही समितीने



प्रश्न उपस्थित केले आहेत. १९३० नंतर जातीनिहाय जनगणना झालेली नसल्याने २०११ मधील अनुसूचित जातींची लोकसंख्या हा सध्याच्या काळासाठी निश्चित निकष मानता येणार नाही, असे निवेदनात म्हटले आहे. तसेच २०२१ ची जनगणना अद्याप पूर्ण झालेली नसल्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गाची अद्ययावत लोकसंख्या निश्चितपणे उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे २०११ ची लोकसंख्या २०२६ मध्ये उपवर्गीकरणासाठी निकष म्हणून वापरणे योग्य ठरणार नाही, अशी भूमिका समितीने घेतली आहे. "बदर समितीचा अहवाल लागू करणे अन्यायकारक" उपवर्गीकरणासाठी आवश्यक असलेली अद्ययावत व विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध नसताना बदर समितीचा अहवाल लागू केल्यास अनुसूचित जाती प्रवर्गावर अन्याय होऊ शकतो, अशी भीती निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे शासनाने अहवालाच्या अंमलबजावणीपूर्वी सर्व संबंधित बाबींचा सखोल विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. संविधानातील तरतुदींचाही संदर्भ समितीने आपल्या निवेदनात भारतीय संविधानाच्या कलम ३४१ चा संदर्भ देत अनुसूचित जातींच्या यादीबाबत केंद्रीय पातळीवर एकसूत्रता राहण्याची आवश्यकता असल्याची भूमिका मांडली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान सभेतील भूमिकेचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला आहे. तसेच १९९२ मधील इंदिरा साहनी विरुद्ध भारत सरकार प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा संदर्भ देत अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणासंदर्भातील विविध घटनात्मक बाबींचा विचार करण्याची मागणी समितीने केली आहे. उपवर्गीकरणाचा निर्णय घेऊ नये अनुसूचित जाती प्रवर्गातील विविध समाजघटकांच्या प्रतिनिधित्वाचा, उपलब्ध आकडेवारीचा आणि घटनात्मक तरतुदींचा सर्वंकष विचार करूनच शासनाने निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. "अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे प्रस्तावित उपवर्गीकरण करू नये," अशी स्पष्ट भूमिका घेत लोकसंघर्ष समितीने मुख्यमंत्री आणि राज्य सरकारने या मागणीचा गांभीर्याने विचार करावा, अशी विनंती केली आहे.

## बावीत अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगतेनिमित्तरक्तदान शिबिर!



जन सम्राट टाईम्स

**अहिल्यानगर | प्रतिनिधी :** जामखेड तालुक्यातील बावी येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगतेनिमित्त समस्त ग्रामस्थ बावी आणि धर्मवीर शंभूराजे ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ ऑगस्ट रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाला बावी गावासह पंचक्रोशीतील तरुण आणि महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. 'रक्तदान करा, जीवनदान द्या', 'तुमचे रक्त, कोणाच्यातरी जीवनाची आशा' आणि 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' या संदेशाने प्रेरित होऊन अनेक रक्तदाते स्वयंस्फूर्तीने पुढे आले. विशेषतः तरुणांसह महिलांनीही रक्तदानात सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. रक्तदानामुळे गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यास मदत होते. त्यामुळे या उपक्रमाच्या माध्यमातून रक्तदानाचे महत्त्व आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. अखंड हरिनाम सप्ताहासारख्या आध्यात्मिक उपक्रमाची सांगता रक्तदानासारख्या लोककल्याणकारी उपक्रमाने करून बावी ग्रामस्थ आणि धर्मवीर शंभूराजे ग्रुपने सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे. अध्यात्मासोबतच समाजसेवेची सांगड घालणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे. रक्तदान शिबिराला मिळालेला तरुणाई आणि महिलांचा प्रतिसाद पाहता 'सेवेतून अध्यात्म आणि रक्तदानातून जीवनदान' हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे अधोरेखित झाला.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स ब्रेक न्यूज ज

## धुळ्यात ८८ राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव २६ खेळाडूंना शासनाच्या शिष्यवृत्तीचे वाटप

### महापौर चषकाच्या आयोजनाची मागणी



जन सम्राट टाईम्स


**धुळे | प्रतिनिधी :** राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धुळे यांच्या वतीने सन २०२५-२६ मध्ये राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या तसेच प्राविण्य प्राप्त केलेल्या ८८ खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. याशिवाय राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी किंवा प्राविण्य मिळविलेल्या २६ खेळाडूंना शासनामार्फत प्राप्त शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. २९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता जे. आर. सिटी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, धुळे येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. जिल्हाधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषदेच्या अध्यक्षा भाग्यश्री विसपुते आणि जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र उपस्थित मान्यवरांच्या हस्ते खेळाडूंना प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी हॉकीचे महान खेळाडू स्व. मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. आनंद पवार यांनी अशा गौरव सोहळ्यांमुळे खेळाडूंना प्रेरणा मिळते, असे सांगितले. धुळे जिल्हा क्रीडा महासंघाचे सचिव पंढरीनाथ बडगुजर यांनी धुळ्याची क्रीडा क्षेत्रातील ओळख व गौरवशाली इतिहास सांगत खेळाडूंना मार्गदर्शन केले. अध्यक्ष डॉ. महेश घुगरी यांनी जिल्ह्यातील खेळाडूंच्या कामगिरीचा चढता आलेख समाधानकारक असल्याचे नमूद केले. मुलींच्या क्रीडा सहभागाचे महापौरांकडून कौतुक कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या व अध्यक्षस्थानी धुळे शहराच्या महापौर मायादेवी परदेशी होत्या. त्यांनी जिल्ह्यातील खेळाडूंच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करताना विशेषतः मुलींचा क्रीडा क्षेत्रातील वाढता सहभाग आणि उल्लेखनीय कामगिरी कौतुकास्पद असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित क्रीडाप्रेमी, क्रीडा शिक्षक व विविध क्रीडा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी धुळे महानगरपालिकेच्या माध्यमातून 'महापौर चषक' क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्याची मागणी केली. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत याबाबत चर्चा करून योग्य निर्णय घेण्यात येईल, असे महापौर मायादेवी परदेशी यांनी सांगितले. २६ खेळाडूंना शिष्यवृत्ती सन २०२५-२६ मध्ये राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या किंवा प्राविण्य मिळविलेल्या २६ खेळाडूंना क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत प्राप्त शासनाच्या शिष्यवृत्तीचे सन्मानपूर्वक वितरण करण्यात आले.

## वृक्षांना राखी बांधून रामजी नगर शाळेत अनोखे रक्षाबंधन

### 'झाडे आमचे रक्षण करतात, आम्ही झाडांचे रक्षण करू'

जन सम्राट टाईम्स



**सोयगाव। प्रतिनिधी:** भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधन सणाला पर्यावरण संवर्धनाची भावनिक जोड देत तालुक्यातील रामजी नगर येथील जिल्हा परिषद शाळेत अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे करण्यात आले. आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरातील वृक्षांना राखी बांधून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. वृक्षांना राखी बांधताना विद्यार्थ्यांनी 'वृक्ष हेच आपले खरे भाऊ' अशी भावना व्यक्त केली. तसेच 'झाडे आमचे रक्षण करतात, आम्ही झाडांचे रक्षण करू' अशी पर्यावरण संवर्धनाची शपथ विद्यार्थ्यांनी घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाचे महत्त्व सांगणारी विविध घोषवाक्ये सादर केली. वृक्षांचे मानवी जीवनातील महत्त्व, वाढते प्रदूषण आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धनाची गरज याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. रक्षाबंधनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग आणि पर्यावरणाप्रती प्रेम, जिव्हाळा व जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा हा उपक्रम ठरला. वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी यावेळी केला. या उपक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेने राबविलेल्या या अभिनव उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले.

भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधन सणाला पर्यावरण संवर्धनाची भावनिक जोड देत तालुक्यातील रामजी नगर येथील जिल्हा परिषद शाळेत अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे करण्यात आले. आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरातील वृक्षांना राखी बांधून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. वृक्षांना राखी बांधताना विद्यार्थ्यांनी 'वृक्ष हेच आपले खरे भाऊ' अशी भावना व्यक्त केली. तसेच 'झाडे आमचे रक्षण करतात, आम्ही झाडांचे रक्षण करू' अशी पर्यावरण संवर्धनाची शपथ विद्यार्थ्यांनी घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाचे महत्त्व सांगणारी विविध घोषवाक्ये सादर केली.

## पारोळा तालुक्यात आनंदाची लाट आमदार ॲड. अमोल पाटील यांच्या हस्ते जलपूजन

### १२ गावांतील शेतीला सिंचनाचा आधार


जन सम्राट टाईम्स



**पारोळा |प्रतिनिधी :** पारोळा शहरासह तालुक्यातील १४ गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रमुख आधार आणि १२ गावांतील शेतीसाठी महत्त्वाचा सिंचन स्रोत असलेला तामसवाडी येथील बोरी मध्यम प्रकल्प यंदा पूर्ण क्षमतेने भरला आहे. धरणात तब्बल ४०.३१ दशलक्ष घनमीटर (द.ल.घ.मी.) जलसाठा उपलब्ध झाल्याने तालुक्यात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर धरणस्थळी आमदार ॲड. अमोल पाटील यांच्या हस्ते विधिवत जलपूजन करण्यात आले. जलपूजनानंतर आमदार अमोल पाटील यांनी धरणातील पाणीसाठ्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी, ग्रामस्थ तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून पाणीपुरवठा व्यवस्था, उपलब्ध जलसाठा आणि सिंचन नियोजनाबाबत माहिती घेतली. १४ गावांच्या पिण्याच्या पाण्याला मोठा आधार बोरी प्रकल्प हा पारोळा तालुक्यासाठी अत्यंत महत्त्वाचा जलस्रोत आहे. पारोळा शहरासह १४ गावांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यात या धरणाची महत्त्वाची भूमिका आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईची तीव्रता कमी होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. १२ गावांतील शेतीला नवसंजीवनी बोरी धरणातील पाण्याचा फायदा १२ गावांतील शेतकऱ्यांना सिंचनासाठी होणार आहे. जलसाठा मुबलक असल्याने आगामी रब्बी हंगामातील पिकांच्या नियोजनाला चालना मिळणार असून, उत्पादनवाढीसह ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही त्याचा सकारात्मक फायदा होण्याची अपेक्षा आहे. पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन यावेळी आमदार अमोल पाटील यांनी उपलब्ध पाणीसाठ्याचा योग्य, काटकसरीने आणि नियोजनबद्ध वापर करण्याचे आवाहन केले. धरणातील पाण्याचा जास्तीत जास्त लाभ नागरिक आणि शेतकऱ्यांना मिळावा, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर भर देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. बोरी धरण तुडुंब भरल्याने पारोळा शहराच्या पाणीपुरवठ्यासह तालुक्यातील सिंचन व्यवस्थेला मोठा आधार मिळाला आहे. त्यामुळे यंदाचा मुबलक जलसाठा हा पारोळा तालुक्याच्या विकासासाठी आशादायी ठरला आहे.

## नरडाणा हादरले! स्टेट बँकेचे ATM चोरट्यांनी पळवले

जन सम्राट टाईम्स




**नरडाणा। प्रतिनिधी:** नरडाणा शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेत स्टेट बँक ऑफ इंडियाचे (SBI) एटीएम चोरट्यांनी लक्ष्य केल्याने शहरात खळबळ उडाली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी एटीएममधील कॅश ट्रेच थेट उचलून नेल्याची धक्कादायक घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार, एटीएममधील सुमारे ११ लाख रुपयांची रोकड लंपास झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. चोरट्यांनी चोरी करण्यापूर्वी एटीएम परिसरातील CCTV कॅमेऱ्यांवर काळ्या रंगाचा स्प्रे मारून पोलिसांच्या तपासात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर एटीएममधील रोकड असलेला कॅश ट्रे घेऊन चोरटे चारचाकी वाहनातून धुळ्याच्या दिशेने पसार झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच नरडाणा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. चोरीचे स्वरूप लक्षात घेता फिंगरप्रिंट तज्ज्ञ आणि श्वानपथकाला पाचारण करण्यात आले. घटनास्थळावरील पुरावे संकलित करून चोरट्यांचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली नरडाणा पोलीस या प्रकरणाचा तपास करीत आहेत. बाजारपेठेच्या मध्यवर्ती भागात एटीएमवर झालेल्या या धाडसी चोरीमुळे व्यापारी आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, चोरीमध्ये नेमकी किती रक्कम लंपास झाली, चोरट्यांची संख्या किती होती आणि ते कोणत्या वाहनातून आले होते, याबाबत पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. CCTV फुटेज व घटनास्थळावरील इतर पुराव्यांच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्यात येत आहे.

## भ्रष्टाचारी नेत्यांचा भरणा; कधीही स्फोट होईल : ॲड. असीम सरोदे

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** भारतीय जनता पक्षाने विविध पक्षांतील भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या व्यक्तींना आपल्या पक्षात सामावून घेतल्याने भविष्यात या राजकीय व्यवस्थेचा कधीही स्फोट होऊ शकतो, असा दावा कायदेतज्ज्ञ व संविधानाचे अभ्यासक ॲड. असीम सरोदे यांनी केला. जाहीर न्याय स्वराज्य संवाद यात्रेनिमित्त धुळ्यात आले असता आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी केंद्र व राज्य सरकारच्या विविध धोरणांवर टीका करताना सरोदे यांनी शेतकरी आणि उद्योगपती यांच्यातील कर्जमाफीच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित केले.

शेतकऱ्यांना कर्जमाफी देताना विविध निकष लावले जातात; मात्र उद्योगपतींच्या कर्जाबाबत वेगळी भूमिका घेतली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. "राजकीय फायदा करून देणाऱ्या उद्योगपतींना कर्जमाफी दिली जाते आणि काही उद्योगपतींना देशाबाहेर जाण्याची संधी मिळते," असा आरोप सरोदे यांनी केला.

अशा धोरणांमुळे जनतेमध्ये रोष निर्माण होऊ शकतो, असेही त्यांनी सांगितले. अजित पवारांबाबत गंभीर दावा यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते व माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूबाबतही ॲड. सरोदे यांनी गंभीर दावा केला. त्यांच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती या प्रकरणी कायदेशीर लढाईसाठी पुढे आल्यास आपण मोफत न्यायालयीन मदत देऊ, अशी भूमिका त्यांनी पत्रकार परिषदेत मांडली. या दाव्याबाबत अधिकृत तपास किंवा न्यायालयीन निष्कर्ष काय आहेत, याबाबत त्यांनी कोणते पुरावे सादर केले, याची स्वतंत्र पुष्टी या वृत्तातून होत नाही. त्यामुळे हा दावा ॲड. सरोदे यांच्या वक्तव्याच्या स्वरूपातच समोर आला आहे. सरकारला जनआंदोलनाचा इशारा केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर सडकून टीका करताना सरकारने आपला कारभार सुधारावा, अन्यथा जनता रस्त्यावर उतरेल, असा इशाराही ॲड. सरोदे यांनी दिला. सामान्य नागरिक, शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. जाहीर न्याय स्वराज्य संवाद यात्रेच्या माध्यमातून संविधानिक मूल्ये, नागरिकांचे अधिकार आणि शासनाच्या धोरणांबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

पत्रकार परिषदेला माजी आमदार शरद पाटील, ॲड. राहुल वाघ, गौतम पगारे, सचिन दीक्षित, बाबा हातेकर, प्रा. अनिल दामोदर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाने विविध पक्षांतील भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या व्यक्तींना आपल्या पक्षात सामावून घेतल्याने भविष्यात या राजकीय व्यवस्थेचा कधीही स्फोट होऊ शकतो, असा दावा कायदेतज्ज्ञ व संविधानाचे अभ्यासक ॲड. असीम सरोदे यांनी केला.

## अवैध धंद्यांविरोधात ॲड. पंकज गोरे यांचा एल्गार

### आंदोलनस्थळी नशेच्या पदार्थांचे प्रदर्शन ॲड. असीम सरोदे यांची आंदोलनाला भेट

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी :** धुळे शहरासह जिल्ह्यात वाढत असलेल्या अवैध धंद्यांना आणि नशेच्या पदार्थांच्या कथित वाढत्या विक्रीला आळा घालण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने ॲड. पंकज गोरे यांनी सुरू केलेले आंदोलन अधिक तीव्र झाले आहे. २७ ऑगस्टपासून सुरू असलेल्या या आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी आंदोलनस्थळी विविध नशेच्या पदार्थांचे प्रदर्शन मांडून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. धुळे शहर व जिल्ह्यात सट्टा-मटका, जुगार, अवैध दारू विक्री, गांजा, गुटखा तसेच इतर अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याचा आरोप करत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी ॲड. गोरे यांनी केली आहे. या अवैध धंद्यांमुळे विद्यार्थी व तरुण पिढी चुकीच्या मार्गाकडे वळत असून, त्यातून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी आंदोलनादरम्यान सांगितले. 'अवैध धंदे कुणाच्या आशीर्वादाने?' शहरातील सट्टा क्लब, पत्त्यांचे क्लब आणि एमडी ड्रग्जसह विविध नशेच्या पदार्थांची कथित विक्री सुरू असल्याचा आरोप करत हे प्रकार नेमके कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत, असा सवाल ॲड. पंकज



गोरे यांनी उपस्थित केला. विक्रीवर तातडीने ठोस कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली. परराज्यातून महाराष्ट्रात येणाऱ्या गुटख्याची धुळे जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्याचा आरोप करत, पोलिसांकडून कारवाई होत असली तरी या तस्करीमागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेण्याची मागणीही त्यांनी केली. ॲड. असीम सरोदे यांची आंदोलनस्थळी भेट धुळ्यात आलेले सुप्रसिद्ध वकील तथा संविधान अभ्यासक ॲड. असीम सरोदे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन ॲड. पंकज गोरे यांच्याकडून आंदोलनाची माहिती जाणून घेतली. अवैध धंद्यांविरोधात न्यायालयीन लढा उभारण्याची वेळ आल्यास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी धुळे जिल्ह्यातून विमल व गुटख्याची मोठ्या प्रमाणावर तस्करी होत असल्याची माहिती ॲड. गोरे यांनी सरोदे यांना दिली. या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याशी संवाद साधून तातडीने कारवाईची मागणी करणार असल्याचे ॲड. सरोदे यांनी सांगितले. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि विविध संघटनांचा पाठिंबा आंदोलनाला पहिल्या दिवसापासून सर्वसामान्य नागरिक तसेच विविध संघटनांचा पाठिंबा मिळत असल्याचे आयोजकांनी सांगितले. दुसऱ्या दिवशी महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला. तिसऱ्या दिवशी आग्रा रोड हॉकर्स युनियनचे रोडगाडीधारक, ज्येष्ठ नागरिक आणि शिक्षकांनीही आंदोलनाला पाठिंबा दिला. धुळे जिल्हा अवैध धंदे व गुन्हेगारीमुक्त करून कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम करावी, या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाची प्रशासनाने दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा ॲड. पंकज गोरे यांनी दिला आहे. यावेळी तेजस गोटे, संदीप सूर्यवंशी, पंकज भारस्कर, सागर साळवे, दिलीप चित्ते, सूरज भावसार, संदीप चौधरी, कार्तिक पाटील, संजय पाटील, विनोद रनमले, प्रवीण मुर्तडक, मनोज गवळी, बंटी गोरे, आप्पा लहामगे, गोपी सोनार, विशाल ढेकळे, गणेश पाखले, स्वप्नील सोनवणे, सौरभ जवराल यांच्यासह विद्यार्थी, तरुण, ज्येष्ठ नागरिक, रोडगाडीधारक व टपरीधारक उपस्थित होते.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# जिल्हा परिषद मराठी शाळेत 26 वर्षांनी एकत्र आले शाळेचे माजी विद्यार्थी.....

## माजी विद्यार्थ्यांकडून शालेय साहित्य, खेळणी व शाळेला भेटवस्तू देत कृतज्ञता व्यक्त

जन सम्राट टाईम्स



**कल्याणे होळ, । प्रतिनिधी:** ज्या शाळेच्या अंगणात बालपण घडले, ज्या शिक्षकांनी जीवनाला दिशा दिली आणि जिथे मैत्रीच्या नात्यांची वीण घट्ट झाली, त्याच शाळेच्या आठवणींना तब्बल २६ वर्षांनी पुन्हा उजाळा मिळाला. कल्याणे होळ येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत सन २००१ ते २००४ या कालावधीत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला.

अनेक वर्षांनंतर जुन्या वर्गमित्रांनी आणि शिक्षकांनी एकत्र येत बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. शाळेच्या वर्गखोल्या, परिसर आणि जुन्या आठवणींमध्ये रमलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. गावातील शाळेत आयोजित करण्यात आलेला हा पहिलाच माजी विद्यार्थी स्नेहमेळावा असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांचे योगदान आपल्या आयुष्यातील धावपळीत बालपणीची शाळा अनेकदा मागे पडते. मात्र, ज्या शाळेने आपल्याला घडविले, तिच्याप्रती काहीतरी देणे लागतो, या भावनेतून माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, खेळणी तसेच शाळेसाठी आवश्यक भेटवस्तू प्रदान केल्या. छोट्याशा कृतीतूनही इतरांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करता येतो, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

जुन्या शिक्षकांची भेट ठरली भावनिक क्षणमाजी विद्यार्थ्यांना घडविणारे आदरणीय सोपान गुरुजी यांची अनेक वर्षांनंतर भेट झाल्याने स्नेहमेळाव्याला विशेष भावनिक रंग मिळाला. गुरुजींसोबत मनमोकळ्या गप्पा मारत जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

यावेळी अंगणवाडीतील शिक्षणसेविका सुरेखा बाई आणि अलका बाई यांनाही विशेष निमंत्रित करून त्यांचा सत्कार करण्यात आला. बालपणी ज्या प्रेमाने त्यांना 'बाई' म्हणून संबोधले जात होते, त्याच आपुलकीने त्यांचा सन्मान करण्यात आल्याने उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. शिक्षक व ग्रामस्थांचे सहकार्य स्नेहमेळाव्याच्या आयोजनासाठी जिल्हा परिषद मराठी शाळेचे विद्यमान शिक्षक राहुल सोनवणे सर व सोनवणे मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. गावातील ग्रामस्थांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून माजी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. कार्य्रमानंतर सर्व माजी विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थांनी एकत्रित भोजनाचा आनंद घेतला. जुन्या मित्रांची भेट, शिक्षकांप्रती कृतज्ञता आणि शाळेसाठी केलेले योगदान यामुळे हा स्नेहमेळावा सर्वांच्या कायमस्वरूपी स्मरणात राहणारा ठरला. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी इतर शाळांतील जुन्या वर्गमित्रांनाही आवाहन केले की, आपल्या शाळेला आयुष्यातून कधीही विसरू नका. आपल्या मित्रांच्या गटानेही शाळेत असा स्नेहमेळावा आयोजित करून शाळेला भेट द्यावी आणि शक्य ते योगदान द्यावे. ज्या शाळेच्या अंगणात बालपण घडले, ज्या शिक्षकांनी जीवनाला दिशा दिली आणि जिथे मैत्रीच्या नात्यांची वीण घट्ट झाली, त्याच शाळेच्या आठवणींना तब्बल २६ वर्षांनी पुन्हा उजाळा मिळाला. कल्याणे होळ येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत सन २००१ ते २००४ या कालावधीत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. अनेक वर्षांनंतर जुन्या वर्गमित्रांनी आणि शिक्षकांनी एकत्र येत बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला.

# अमळनेर तालुका क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदी संदीप सैंदाणे

जन सम्राट टाईम्स

**अमळनेर | प्रतिनिधी** क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर आणि जळगाव जिल्हाध्यक्ष शरद विनायक पाटील यांच्या आदेशानुसार अमळनेर तालुका व जळगाव जिल्हा कार्यकारिणीतील महत्त्वपूर्ण नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. अमळनेर तालुका अध्यक्षपदी संदीप बबनराव सैंदाणे (भैय्यासाहेब), तर जळगाव जिल्हा उपाध्यक्षपदी प्रकाश बोरसे यांची बिनविरोध व बहुमताने निवड करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना जिल्हाध्यक्ष शरद पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांनी दोन्ही पदाधिकाऱ्यांना पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संदीप सैंदाणे हे स्वतः शेतकरी असून शेतकरी, कष्टकरी आणि बळीराजाच्या विविध प्रश्नांची त्यांना प्रत्यक्ष जाण आहे. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी तसेच अन्यायाविरोधात त्यांनी यापूर्वीही विविध आंदोलने आणि लढ्यांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. शेतकऱ्यांप्रती असलेली तळमळ, जिव्हाळा आणि संघर्षाची भूमिका लक्षात घेऊन संघटनेने त्यांच्यावर अमळनेर तालुक्याच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविली आहे. प्रत्यक्ष शेतकरी असलेल्या आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी बांधावर उतरून संघर्ष करणाऱ्या सैंदाणे यांची तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याने स्थानिक शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडण्यासाठी आणि संघटनेची तालुक्यातील बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाचा उपयोग होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आगामी काळात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी संघटनेच्या माध्यमातून अधिक व्यापक पातळीवर आंदोलने व जनजागृती करण्यात येणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या नियुक्ती सोहळ्याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश बोरसे, तालुका अध्यक्ष संदीप सैंदाणे यांच्यासह विजय पाटील, मनोज पाटील ठाकूर तसेच क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# भाऊसाहेब पाटील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये क्रीडा दिन

## विद्यार्थ्यांना विकासाचे मार्गदर्शन



जन सम्राट टाईम्स

**पाळधी बु. | प्रतिनिधी :** येथील भाऊसाहेब गुलाबरावजी पाटील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे महान हॉकीपटू आणि 'हॉकीचे जादूगार' म्हणून प्रसिद्ध असलेल्या मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे प्राचार्य नरेंद्र आर. मांडगे यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष विक्रम दादा पाटील व सचिव प्रताप दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देण्याचा संदेश देण्यात आला. प्राचार्य नरेंद्र आर. मांडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाबरोबरच सर्वांगीण विकासासाठी क्रीडेलाही तितकेच महत्त्व असल्याचे सांगितले. खेळामुळे शरीर सुदृढ राहण्यासोबतच आत्मविश्वास, शिस्त, नेतृत्वगुण, संघभावना, संयम आणि निर्णयक्षमता विकसित होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्रीडा प्रकारात नियमित सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. क्रीडाशिक्षक ज्ञानेश्वर घुले यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाची माहिती दिली. त्यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच हॉकी, क्रिकेट, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कुस्ती, धावणे, लांब उडी, उंच उडी आणि गोळाफेक आदी विविध क्रीडा प्रकारांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी विविध खेळांचे नियम, त्यांचे शारीरिक व मानसिक फायदे तसेच क्रीडा क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे, असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविणे, नियमित व्यायामाची सवय लावणे आणि 'फिट इंडिया'चा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध क्रीडा प्रकारांविषयी माहिती जाणून घेतली. कार्यक्रमातून 'खेळा, तंदुरुस्त राहा आणि निरोगी जीवन जगा' हा आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# कानळदा जिल्हा परिषद मुलींच्या शाळेत स्वच्छता अभियान उत्साहात

## ग्रामस्थ व शालेय व्यवस्थापन समितीचा उत्स्फूर्त सहभाग

जन सम्राट टाईम्स



**जळगाव । प्रतिनिधी:** परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर यांच्या स्वच्छता अभियानाच्या संदेशाने प्रेरित होऊन कानळदा येथील जिल्हा परिषद मराठी मुलींच्या शाळेत स्वच्छता अभियान उत्साहपूर्ण वातावरणात राबविण्यात आले. या अभियानात गावाचे सरपंच पुंडलिक सपकाळे, शाळेचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वांनी एकत्रितपणे शाळेचा परिसर, मैदान, वर्गखोल्यांच्या आजूबाजूचा परिसर तसेच परिसरातील कचरा साफ करून स्वच्छता केली. यावेळी 'स्वच्छ शाळा, सुंदर शाळा आणि निरोगी शाळा' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आला. विद्यार्थिनींमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण व्हावी, तसेच शाळा आणि गावाचा परिसर कायम स्वच्छ ठेवण्याची सवय लागावी, यासाठी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. सरपंच पुंडलिक सपकाळे यांनी स्वच्छता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाली पाहिजे, असे आवाहन केले. मुख्याध्यापक व शिक्षकांनीही विद्यार्थिनींना स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगितले. या स्वच्छता अभियानामुळे शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर झाला. ग्रामस्थ, शालेय व्यवस्थापन समिती आणि शिक्षक यांच्या एकजुटीतून राबविण्यात आलेले हे अभियान सामाजिक सहभागाचे उत्तम उदाहरण ठरले. अभियानाचे ग्रामस्थ व पालकांकडून कौतुक करण्यात आले. 'स्वच्छता हीच सेवा, स्वच्छ शाळा हीच सुंदर शाळा!' या संदेशाने अभियानाची सांगता करण्यात आली. परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर यांच्या स्वच्छता अभियानाच्या संदेशाने प्रेरित होऊन कानळदा येथील जिल्हा परिषद मराठी मुलींच्या शाळेत स्वच्छता अभियान उत्साहपूर्ण वातावरणात राबविण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वांनी एकत्रितपणे शाळेचा परिसर, मैदान, वर्गखोल्यांच्या आजूबाजूचा परिसर तसेच परिसरातील कचरा साफ करून स्वच्छता केली. यावेळी 'स्वच्छ शाळा, सुंदर शाळा आणि निरोगी शाळा' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आला.

# महात्मा फुले हायस्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

## विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव,। (प्रतिनिधी):** धरणगाव शहरातील सुवर्ण महोत्सवी शाळा महात्मा फुले हायस्कूल येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी पी. डी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेचे क्रीडाशिक्षक एच. डी. माळी यांनी विद्यार्थ्यांना मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा कारकिर्दीची तसेच त्यांच्या कार्याची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व पटवून देताना ते म्हणाले, "खेळ खेळल्याने विद्यार्थ्यांमध्ये खिलाडूवृत्ती निर्माण होते. नियमित खेळामुळे आरोग्य उत्तम राहते आणि आनंदी व निरोगी जीवन जगण्यास मदत होते." राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शाळेच्या मैदानावर विविध क्रीडा प्रकारांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. यामध्ये व्हॉलीबॉल, क्रिकेट, लिगोरी आणि कबड्डी आदी खेळांचा समावेश होता. विविध खेळांमधून विद्यार्थ्यांनी उत्साह, शिस्त, संघभावना आणि खिलाडूवृत्तीचे दर्शन घडविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. डी. पाटील यांनी केले, तर व्ही. टी. माळी यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे राष्ट्रीय क्रीडा दिनाचा कार्यक्रम उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. धरणगाव शहरातील सुवर्ण महोत्सवी शाळा महात्मा फुले हायस्कूल येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी पी. डी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेचे क्रीडाशिक्षक एच. डी. माळी यांनी विद्यार्थ्यांना मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा कारकिर्दीची तसेच त्यांच्या कार्याची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व पटवून देताना ते म्हणाले, "खेळ खेळल्याने विद्यार्थ्यांमध्ये खिलाडूवृत्ती निर्माण होते. नियमित खेळामुळे आरोग्य उत्तम राहते आणि आनंदी व निरोगी जीवन जगण्यास मदत होते." राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शाळेच्या मैदानावर विविध क्रीडा प्रकारांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. यामध्ये व्हॉलीबॉल, क्रिकेट, लिगोरी आणि कबड्डी आदी खेळांचा समावेश होता. विविध खेळांमधून विद्यार्थ्यांनी उत्साह, शिस्त, संघभावना आणि खिलाडूवृत्तीचे दर्शन घडविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. डी. पाटील यांनी केले.

# नाथाभाऊंच्या अमृत महोत्सवानिमित्त मानमोडीत ५०० फोल्डर फाईलचे वाटप

जन सम्राट टाईम्स

**मानमोडी, ता. बोदवड । प्रतिनिधी:** लोकनेते मा. नाथाभाऊ यांच्या नाबाद ७५व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त मानमोडी येथे सामाजिक बांधिलकी जपत एक अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. गावातील प्रत्येक कुटुंबाला महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित व व्यवस्थित जतन करता यावीत, या उद्देशाने कार्यकर्त्यांच्या सहकार्याने प्लास्टिक कोटेड चैन असलेल्या ५०० आकर्षक फोल्डर फाईलचे वितरण करण्यात येणार आहे. दैनंदिन जीवनात विविध शासकीय व वैयक्तिक कामांसाठी लागणारी कागदपत्रे अनेकदा वेगवेगळ्या ठिकाणी ठेवली जातात. त्यामुळे ऐनवेळी कागदपत्रांची शोधाशोध करावी लागते.

ही अडचण दूर करण्यासाठी सर्व महत्त्वाची कागदपत्रे एकाच ठिकाणी सुरक्षित ठेवता यावीत, या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

अनेक महत्त्वाची कागदपत्रे ठेवण्याची सुविधा



या फोल्डरमध्ये जन्म दाखला, शाळेचे दाखले, आधारकार्ड, पॅनकार्ड, रेशनकार्ड, एटीएम कार्ड, बांधकाम कार्ड, आयुष्मान कार्ड, ७/१२ उतारे, फेरफार नोंदी, जात प्रमाणपत्र, वारस दाखले, घर, वाहन व शेतजमिनीशी संबंधित कागदपत्रे, बँक पासबुक तसेच दुर्मिळ छायाचित्रे आदी कागदपत्रे सुरक्षितपणे ठेवता येणार आहेत. विद्यार्थी, महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच प्रत्येक कुटुंबाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारा हा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले. सामाजिक बांधिलकीतून उपक्रम लोकनेते नाथाभाऊ यांनी प्रदीर्घ काळ जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने संघर्ष केला असून, शेतकरी व कष्टकऱ्यांचा आवाज बुलंद करण्याचे काम केले आहे. त्यांच्या अमृत महोत्सवी ७५व्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत मानमोडी येथे हा छोटासा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे तालुकाध्यक्ष आबा पाटील यांच्या पुढाकाराने तसेच समस्त गावकरी मंडळी व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. दरम्यान, लोकनेते नाथाभाऊ यांना उदंड, निरामय आणि आरोग्यदायी दीर्घायुष्य लाभावे, यासाठी मानमोडी ग्रामस्थांच्या वतीने ग्रामदेवता आई मरीआईच्या चरणी मंगलकामना करण्यात आल्या. लोकनेते मा. नाथाभाऊ यांच्या नाबाद ७५व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त मानमोडी येथे सामाजिक बांधिलकी जपत एक अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

# मेजर ध्यानचंद यांच्या स्मृतींना अभिवादन

## रजनीताई देशमुख महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

जन सम्राट टाईम्स



**भडगाव । प्रतिनिधी:** तालुक्यातील पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. डॉ. एस. डी. भैसे होते, तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयाच्या प्रांगणात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. दिनेश तांदळे यांनी प्रास्ताविकातून मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा कारकिर्दीचा आढावा घेतला. मेजर ध्यानचंद हे आजच्या खेळाडूंसाठी प्रेरणास्रोत असून, प्रखर राष्ट्रप्रेम, स्वाभिमान, निष्ठा आणि प्रामाणिकपणा या गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व उजळून निघाले होते, असे त्यांनी सांगितले. भारताने ऑलिंपिकमध्ये हॉकीच्या माध्यमातून आठ सुवर्णपदके मिळविली असून, त्यापैकी तीन सुवर्णपदकांच्या विजयात मेजर ध्यानचंद यांच्या उत्कृष्ट खेळाचा महत्त्वपूर्ण वाटा होता. त्यांच्या क्रीडा कौशल्यातून आजच्या पिढीतील खेळाडूंनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन डॉ. तांदळे यांनी केले. अध्यक्षीय मनोगतात प्रा. डॉ. एस. डी. भैसे यांनी विद्यार्थ्यांनी जीवनात कोणतेही ध्येय साध्य करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि सातत्य ठेवून प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. सी. एस. पाटील, डॉ. अतुल देशमुख, डॉ. गजानन चौधरी, इंदिरा लोखंडे, डॉ. जनार्दन देवरे, डॉ. अधिकराव पाटील, प्रा. प्रवीण देसले, प्रा. ज्योती नन्नवरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी-खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रीडा समिती सदस्य प्रा. एस. सी. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.तालुक्यातील पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. डॉ. एस. डी. भैसे होते, तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयाच्या प्रांगणात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. दिनेश तांदळे यांनी प्रास्ताविकातून मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा कारकिर्दीचा आढावा घेतला. मेजर ध्यानचंद हे आजच्या खेळाडूंसाठी प्रेरणास्रोत असून, प्रखर राष्ट्रप्रेम, स्वाभिमान, निष्ठा आणि प्रामाणिकपणा या गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व उजळून निघाले.

# पारंपरिक लोहार व्यवसायाला आजही जपलाय जिवंतपणा

जन सम्राट टाईम्स

**गंगाखेड | प्रतिनिधी :** आधुनिक यंत्रसामग्रीचा वाढता वापर आणि बदलत्या जीवनशैलीमुळे अनेक पारंपरिक व्यवसाय काळाच्या ओघात मागे पडत आहेत. मात्र, गंगाखेड परिसरात एक लोहार कुटुंब आजही आपल्या पारंपरिक व्यवसायाची परंपरा जपत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. रस्त्याच्या कडेला साध्या पत्र्याच्या छताखाली लोखंड तापवून विविध शेतीची अवजारे तयार करण्याचे काम आजही सुरू आहे. हातातील हातोडा, ऐरण आणि इतर पारंपरिक साधनांच्या साहाय्याने लोखंडाला हवा तसा आकार देत कारागीर विविध अवजारे तयार करतात. विळे, कोयते, कुऱ्हाडी तसेच शेतीच्या विविध कामांसाठी आवश्यक असलेली लोखंडी अवजारे येथे तयार केली जातात. अनुभवातून आलेले कौशल्य आणि मेहनतीच्या जोरावर हा व्यवसाय आजही टिकून आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी शेतीची अवजारे हा दैनंदिन कामाचा महत्त्वाचा भाग आहे. पारंपरिक पद्धतीने तयार होणाऱ्या अवजारांना आजही मागणी असल्याचे दिसून येते. स्थानिक पातळीवर अवजारे उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांचीही सोय होते.

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात पारंपरिक व्यवसाय आणि कारागिरी जतन करण्याची गरज आहे. पिढ्यान्‌पिढ्या हस्तांतरित होत आलेले हे कौशल्य केवळ व्यवसाय नसून ग्रामीण संस्कृतीचा आणि श्रमपरंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. अशा कारागिरांना प्रोत्साहन, बाजारपेठ आणि आवश्यक सुविधा मिळाल्यास ही कला पुढील पिढ्यांपर्यंत टिकून राहण्यास मदत होईल. रस्त्याच्या कडेला लोखंड तापवून त्याला आकार देणाऱ्या या कारागिराच्या हातातील हातोड्याचा प्रत्येक घाव पारंपरिक कौशल्याची आणि कष्टाच्या संस्कृतीची साक्ष देत आहे.

# ए.टी.डी. द्वितीय वर्षाच्या परीक्षेत कु. भूमी मनोज पाटील राज्यातून प्रथम

## 'माँ से बेटी सवाई' उपक्रमांतर्गत लिनेस क्लब ऑफ पाचोरातर्फे सत्कार

जन सम्राट टाईम्स



**भडगाव । प्रतिनिधी :** बालपणापासून चित्रकलेची आवड जोपासत वडिलांकडून मिळालेल्या कलेच्या वारशाला मेहनत, जिद्द आणि चिकाटीची जोड देणाऱ्या कु. भूमी मनोज पाटील हिने ए.टी.डी. द्वितीय वर्षाच्या परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत असून, लिनेस क्लब ऑफ पाचोरातर्फे 'माँ से बेटी सवाई' या उपक्रमांतर्गत तिचा सत्कार करण्यात आला. भूमीने आपले माध्यमिक शिक्षण श्री. गो. से. हायस्कूल, पाचोरा येथे पूर्ण केले.

शालेय जीवनापासूनच तिने चित्रकलेतील आपली आवड आणि कलागुण जोपासले. लिनेस क्लब ऑफ पाचोराच्या अध्यक्षा प्रा. सौ. जयश्रीताई वाघ यांच्या फिनिक्स अकॅडमीतही भूमीने शिक्षण घेतले. विद्यार्थीदशेपासूनच तिला कला क्षेत्रात प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळत राहिले. भूमीलाचित्रकलेचा वारसा तिचे वडील पेंटर मनोज पाटील यांच्याकडून मिळाला. साईन बोर्ड पेंटर असलेल्या वडिलांची पेंटिंगची कला ती बालपणापासून जवळून पाहत होती. कार्टून आणि स्केच काढण्यापासून सुरू झालेला तिचा कलाप्रवास पुढे विविध चित्रकला स्पर्धांपर्यंत पोहोचला. तालुकास्तरीय तसेच इतर स्पर्धांमध्ये तिने अनेकदा प्रथम क्रमांक मिळवून आपल्या कलेची छाप उमटवली. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही तिच्या वडिलांनी तिच्या कलेला कधीही अडथळा येऊ दिला नाही. आवश्यक चित्रकला साहित्य उपलब्ध करून देत त्यांनी तिला सातत्याने प्रोत्साहन दिले. घरातील कामे सांभाळून भूमीने स्केचिंग, रंगकाम आणि चित्रकलेचा नियमित सराव सुरू ठेवला. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर तिने फाईन आर्ट्स, मुंबई येथे शिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त केली.

वडिलांच्या पाठिंब्याने तिने सीईटीची तयारी केली आणि चित्रकलेच्या अभ्यासक्रमासाठी तिची निवड झाली. त्यानंतर तिने सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथे एक वर्ष शिक्षण घेतले. मात्र दुसऱ्या वर्षी योग्य वसतिगृहाची व्यवस्था उपलब्ध न झाल्याने तिला हे शिक्षण अपूर्ण सोडावे लागले. या परिस्थितीमुळे ती निराश झाली असताना वडिलांनी तिला आधार देत "पेंटिंग कधीही बंद करू नकोस, तुझ्यात कला आहे," असा आत्मविश्वास दिला. वडिलांच्या प्रेरणेतून भूमीने स्व. अनिलदादा देशमुख चित्रकला महाविद्यालयात ए.टी.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. संदीप पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

नियमित शिक्षण आणि अथक सरावाच्या बळावर भूमीने अखेर आपल्या मेहनतीचे रूपांतर यशात केले. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील ए.टी.डी. द्वितीय वर्षाच्या परीक्षेत राज्यातून प्रथम क्रमांक मिळवत तिने कुटुंबीय,तिचे पुढील ध्येय जी.डी. आर्टचे शिक्षण पूर्ण करून चित्रकलेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्याचे आहे. भूमीच्या या यशाचा गौरव करण्यासाठी लिनेस क्लब ऑफ पाचोरातर्फे 'माँ से बेटी सवाई' उपक्रमांतर्गत तिचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षा प्रा. सौ. जयश्रीताई वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली लिनेस क्लबच्या ज्येष्ठ संचालिका ॲड. प्रा. सौ. वैशालीताई बोरकर, ज्येष्ठ संचालिका सौ. रूपालीताई पाटील, सचिव सौ. सरलाताई पाटील, कोषाध्यक्ष सौ. प्रियाजी लाहोटी, PRO व सहसचिव कु. चेतना रणदीप हिरे यांच्या हस्ते भूमीचा गौरव करण्यात आला.

# कानळदा येथे रक्षाबंधनातून जपला संस्कारांचा आणि बंधुभावाचा धागा!

## जिल्हा परिषद शाळेत चिमुकल्या भावंडांचा भावस्पर्शी सोहळा; सपकाळे यांच्या संकल्पनेतून अनोखा उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी :** शाळा म्हणजे केवळ अक्षरज्ञान देणारी संस्था नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या मनात संस्कार, संस्कृती, प्रेम, जिव्हाळा आणि सामाजिक मूल्यांची रुजवणूक करणारे महत्त्वपूर्ण संस्कारकेंद्र आहे. याच विचारातून कानळदा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत रक्षाबंधनाचा भावस्पर्शी आणि संस्कारमय सोहळा उत्साहात पार पडला. गावाचे सरपंच पुंडलिक सपकाळे यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. जिल्हा परिषद मुलांच्या शाळेतील विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद कन्या शाळेत रक्षाबंधनासाठी आमंत्रित करण्यात आले. यावेळी चिमुकल्या बहिणींनी आपल्या भावांचे औक्षण करून त्यांच्या हातावर प्रेम, आपुलकी आणि रक्षणाच्या पवित्र भावनेचे प्रतीक असलेली राखी बांधली. भावांनीही बहिणींना प्रेमाची छोटीशी भेट म्हणून पेन व शिसपेन्सिल देत स्नेहबंध अधिक दृढ केला. "सण संस्कारांशी जोडणारा सुंदर दुवा" या प्रसंगी सरपंच पुंडलिक सपकाळे यांनी विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाच्या सांस्कृतिक परंपरेचे आणि भावनिक महत्त्वाचे मार्गदर्शन केले. "प्रत्येक सण हा केवळ आनंद साजरा करण्याचा प्रसंग नसतो, तर तो आपल्या संस्कृतीशी आणि संस्कारांशी जोडणारा सुंदर दुवा असतो," असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या परंपरांचा आदर आणि जतन करण्याचे आवाहन केले.

बालवयातच मुलांच्या मनात संस्कृतीविषयी अभिमान, नात्यांप्रती जिव्हाळा आणि परस्पर सन्मानाची भावना रुजणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

रक्षाबंधनाच्या माध्यमातून मुला-मुलींमध्ये प्रेम, विश्वास, काळजी, संरक्षण आणि परस्पर सन्मान या जीवनमूल्यांची रुजवणूक होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. चिमुकल्यांच्या हास्याने शाळेचा परिसर फुलला राखी बांधतानाचे बहिणींच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य, भावांच्या डोळ्यांतील आनंद आणि एकमेकांना भेटवस्तू देतानाचा उत्साह यामुळे शाळेचे वातावरण



भावनांनी भारावून गेले. निसर्गाच्या सान्निध्यात साजरा झालेला हा रक्षाबंधन सोहळा विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर संस्कारांची अविस्मरणीय छाप उमटवून गेला. शिक्षणासोबत संस्कारांचीही गरज शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश भगवान सपकाळे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. शाळेत अशा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कृती आणि संस्कारांचे बीजारोपण होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबत संस्कारांचीही तितकीच आवश्यकता आहे, असे त्यांनी नमूद करत शिक्षकांचे कौतुक केले. या उपक्रमाचे माता-पालक संघातील महिला, पालक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त स्वागत केले. शाळा आणि गाव यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ करणारा तसेच संस्कृती आणि शिक्षणाचा सुंदर मिलाफ घडवून आणणारा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुलांच्या व मुलींच्या शाळेतील शिक्षक-शिक्षिकांनी नियोजन व व्यवस्थापनात मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाला आनंदमय स्वरूप दिले. मान्यवरांची उपस्थिती यावेळी मुख्याध्यापक राजू सोनवणे, भास्करराव टोके, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश भगवान सपकाळे, पूनम संजय सपकाळे, ग्रामपंचायत सदस्य वासंती राणे, जगदीश सपकाळे, ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षक-शिक्षिका, जितेंद्र सपकाळे, तुषार विसपुते, अनिल सपकाळे, राहुल सोनवणे, संदिप इंगळे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्षाबंधनाच्या एका नाजूक धाग्यातून प्रेम, विश्वास, आपुलकी आणि संस्कारांची घट्ट वीण विणली गेली. चिमुकल्या भावंडांच्या निरागस स्नेहाने कानळदा जिल्हा परिषद शाळेचा परिसर राख्यांच्या रंगासोबतच माणुसकी आणि संस्कारांच्या उबदार भावनेने उजळून निघाला.

# जिंकणे महत्त्वाचे; पण खिलाडूवृत्ती जपणे त्याहून महत्त्वाचे : पालकमंत्री गुलाबराव पाटील

## राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा; राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा गौरव, जळगावचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | (प्रतिनिधी):** , खेळ आपल्याला केवळ विजय मिळविण्याची प्रेरणा देत नाही, तर शिस्त, मेहनत, संयम, संघभावना आणि पराभवानंतर पुन्हा उभे राहण्याची ताकद देतो. जळगाव जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये गुणवत्ता आणि जिद्द असून, त्यांना आवश्यक सुविधा व संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. खेळाडूंनी जिल्ह्यापुरते मर्यादित न राहता महाराष्ट्र, देशाचे प्रतिनिधित्व करावे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर जळगावचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. श्री छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुलातील सभागृहात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार सुरेश भोळे, उपमहापौर मनोज चौधरी, जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीप दिघे, नगरसेवक नीलेश तायडे, तालुका क्रीडा अधिकारी जगदीश चौधरी यांच्यासह श्री शिवछत्रपती पुरस्कार विजेते खेळाडू, राज्य व राष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केलेले खेळाडू, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, पालक आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते. क्रीडा सुविधांसाठी २५० कोटींच्या विभागीय क्रीडा संकुलाचे काम पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, जळगावच्या खेळाडूंना आधुनिक आणि दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी जिल्ह्यात सुमारे २५० कोटी रुपयांच्या विभागीय क्रीडा संकुलाचे काम सुरू आहे. तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुलातही खेळाडूंसाठी विविध सुविधा मंजूर करण्यात आल्या आहेत. या सुविधांचा पुरेपूर उपयोग करून खेळाडूंनी कठोर मेहनत, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या बळावर राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवावे.

मैदानावर विजय मिळविताना प्रतिस्पर्ध्याचा सन्मान करावा आणि खिलाडूवृत्ती कायम जपावी, असे त्यांनी सांगितले. 'खेळ आनंदासाठी खेळा, विजयासाठी मेहनत करा आणि देशाचा अभिमान वाढवण्यासाठी जिंका,' असे प्रेरणादायी आवाहनही पालकमंत्री पाटील यांनी केले. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा गौरव कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये जळगाव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. खेळासोबत पर्यावरण संवर्धनाचाही संदेश कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या प्रत्येकाला एक झाडाचे रोप देऊन त्याचे संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले. दोन वर्षांनंतर हे रोपटे सुदृढ आणि सुंदर पद्धतीने वाढविणाऱ्या व्यक्तीस पाच हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीप दिघे यांनी दिली. सूत्रसंचालन सुरेश धरपुडे व सचिन निकम यांनी केले, तर जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीप दिघे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला पालक, क्रीडाप्रेमी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गाढोदे येथे वर्षावास प्रवचन मालिकेचे सातवे पुष्प संपन्न

## 'अनित्य, अनात्म आणि दुःख' विषयावर आयु. बाबूराव वाघ यांचे प्रबोधन

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी :** भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व अंतर्गत जळगाव तालुक्याच्या वतीने आयोजित राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे सातवे पुष्प गाढोदे, ता. जळगाव येथे धम्ममय वातावरणात संपन्न झाले. यावेळी आयु. बाबूराव वाघ (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, लेखक, जळगाव) यांनी 'अनित्य, अनात्म आणि दुःख' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. भगवान बुद्धांच्या धम्मातील या महत्त्वपूर्ण संकल्पना त्यांनी अत्यंत सोप्या व सहज भाषेत स्पष्ट केल्या. तसेच दैनंदिन जीवनातील छोट्या-छोट्या उदाहरणांचा आधार घेत विषयाचे विवेचन केल्याने उपस्थितांना धम्मविचार सहजपणे समजून घेता आले. याप्रसंगी आयु. राजेश इंगळे (तालुका अध्यक्ष, जळगाव), आद. किरण सोनवणे (तालुका संस्कार सचिव), आद. जयपाल धुरंधर (तालुका पर्यटन सचिव), आद. गौतम सपकाळे (बौद्धाचार्य), आद. आधारअण्णा सपकाळे (माजी श्रामणेर), आद. समिंदर सपकाळे (माजी श्रामणेर), आद. संतोष सपकाळे (माजी श्रामणेर) यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच गाढोदे महिला ग्राम शाखेच्या अध्यक्षा आद. कविताताई सपकाळे व त्यांच्या संपूर्ण कार्यकारिणीसह परिसरातील श्रद्धाशील बौद्ध उपासक-उपासिका तसेच बालक-बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. गौतम सपकाळे यांनी केले, तर आयु. नी. कविताताई सपकाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. वर्षावासाच्या निमित्ताने आयोजित या धम्म प्रवचन मालिकेतून भगवान बुद्धांचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा आणि धम्मविचारांची जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जात आहे. गाढोदे येथील कार्यक्रमाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे परिसरात धम्ममय वातावरण निर्माण झाले होते.

# मैत्रीय बुद्ध विहारात वर्षावास प्रवचन मालिकेचे सातवे पुष्प संपन्न

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी:** नालंदा नगर, भुसावळ येथील मैत्रीय बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व यांच्या वतीने आयोजित वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे सातवे पुष्प उत्साहपूर्ण आणि धम्ममय वातावरणात संपन्न झाले. या प्रवचन मालिकेतील सातव्या कार्यक्रमात आयु.नी. प्रियांका ताई अहिरे (जिल्हाध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व) यांनी 'अनित्य, अनात्म व दुख' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

त्यांनी अत्यंत सोप्या, सहज आणि सर्वांना समजेल अशा भाषेत भगवान बुद्धांच्या धम्मातील या मूलभूत तत्त्वांचे विवेचन केले. मानवी जीवनातील परिवर्तनशीलता, 'मी'पणाची संकल्पना आणि दुःखाचे स्वरूप याबाबत त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून उपस्थितांना धम्मविचार समजावून सांगितले. बुद्धांच्या शिकवणुकीनुसार जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमास आद.नि. सुजाताताई जंजाळे, आद.नि. वर्षाताई जाधव, आद.नि. घायतडक ताई (शहर संघटक), आद. अनुसयाताई डी. अहिरे, आद. सुमनताई पवार, आद. सीमाताई बावस्कर तसेच आद.नि. माधुरी ताई भालेराव (शहर कार्यकारिणी) यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी परिसरातील श्रद्धाशील व धम्मविचारांशी बांधिलकी असलेल्या बौद्ध उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रवचनाचा लाभ घेतला. उपस्थितांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वर्षावासाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या प्रवचन मालिकेतून धम्मविचारांचा प्रसार आणि समाजामध्ये बौद्ध तत्त्वज्ञानाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. कार्यक्रम भक्तिमय आणि प्रसन्न वातावरणात संपन्न झाला. नालंदा नगर, भुसावळ येथील मैत्रीय बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व यांच्या वतीने आयोजित वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे सातवे पुष्प उत्साहपूर्ण आणि धम्ममय वातावरणात संपन्न झाले. या प्रवचन मालिकेतील सातव्या कार्यक्रमात आयु.नी. प्रियांका ताई अहिरे (जिल्हाध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व) यांनी 'अनित्य, अनात्म व दुख' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी अत्यंत सोप्या, सहज आणि सर्वांना समजेल अशा भाषेत भगवान बुद्धांच्या धम्मातील या मूलभूत तत्त्वांचे विवेचन केले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# भीम ज्योती बुद्ध विहारात वर्षावासाचा 31 वा दिवस आणि श्रावण पौर्णिमा भक्तिमय वातावरणात

## ६७ उपासक-उपासिकांनी घेतले अष्टशील; भदंत नागवंश महाथेरो यांची धम्मदेसना

जन सम्राट टाईम्स



**चिनावल| प्रतिनिधी:** | भीम ज्योती बुद्ध विहारात २८ ऑगस्ट २०२६ रोजी वर्षावासाचा ३१ वा दिवस आणि श्रावण पौर्णिमेचा पावन सोहळा भक्तिमय व धम्ममय वातावरणात उत्साहात पार पडला. पूजनीय भदंत नागवंश महाथेरो (नागपूर) यांच्या पावन सानिध्यात विविध धार्मिक व धम्मविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी ६ वाजता सुत्तपठणानंतर उपासक-उपासिकांसाठी अष्टशील ग्रहणाचा कार्यक्रम झाला. श्रावण पौर्णिमेच्या निमित्ताने एकूण ६७ उपासक-उपासिकांनी श्रद्धेने अष्टशील ग्रहण केले. यावेळी पंचशील ध्वजारोहण सौ. सोनाली भीमराव सपकाळे यांच्या हस्ते भक्तिभावाने करण्यात आले. सायंकाळी ७ वाजता सामूहिक परित्राण पाठाचे आयोजन करण्यात आले. धम्मश्रवणासाठी भीम ज्योती बुद्ध विहार उपासक-उपासिकांनी खचाखच भरला होता. यावेळी भदंत नागवंश महाथेरो यांनी पौर्णिमेचे औचित्य साधून भगवान बुद्धांच्या काळातील तीन महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटनांवर सोप्या आणि प्रांजळ भाषेत धम्मदेसना केली. यामध्ये भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर झालेली पहिली धम्मसंगीती, श्रेष्ठी अनाथपिंडिक यांनी जेतवन विहारासाठी केलेले महान दान आणि अंगुलिमालाचे भगवान बुद्धांच्या करुणेमुळे झालेले हृदयपरिवर्तन व धम्मदीक्षा या विषयांचा समावेश होता. उपस्थित उपासक-उपासिकांनी ही धम्मदेसना एकाग्रतेने श्रवण केली. कार्यक्रमाची सांगता गोड खीरदानाने करण्यात आली. ६ सप्टेंबरला महिला धम्म प्रशिक्षण शिबिर दरम्यान, भीम ज्योती बुद्ध विहाराच्या वतीने येत्या ६ सप्टेंबर रोजी महिला धम्म प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विहाराचे अध्यक्ष आदरणीय संजय भालेराव यांनी परिसरातील माता-भगिनींनी मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. महाप्रजापती गौतमींपासून माता रमाई आणि डॉ. सविता आंबेडकर यांच्यापर्यंत महिलांनी धम्माच्या वाटचालीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. कुटुंब आणि भावी पिढीवर धम्माचे संस्कार रुजविण्यासाठी महिलांनी धम्मज्ञानाने समृद्ध होणे गरजेचे असल्याचे संजय भालेराव यांनी सांगितले. दैनंदिन जीवनातील व्यापातून वेळ काढून आत्मिक आणि धम्म प्रगतीसाठी परिसरातील अधिकाधिक उपासिकांनी या शिबिरात सहभागी व्हावे व आपली नावे लवकरात लवकर नोंदवावीत, असे आवाहन संजय भालेराव, अध्यक्ष तसेच भीम ज्योती बुद्ध विहार समिती व उपासक-उपासिका संघ, चिनावल यांच्या वतीने करण्यात आले आहे. भीम ज्योती बुद्ध विहारात २८ ऑगस्ट २०२६ रोजी वर्षावासाचा ३१ वा दिवस आणि श्रावण पौर्णिमेचा पावन सोहळा भक्तिमय व धम्ममय वातावरणात उत्साहात पार पडला. पूजनीय भदंत नागवंश महाथेरो सानिध्यात विविध धार्मिक व धम्मविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी ६ वाजता सुत्तपठणानंतर उपासक-उपासिकांसाठी अष्टशील ग्रहणाचा कार्यक्रम झाला. श्रावण पौर्णिमेच्या निमित्ताने एकूण ६७ उपासक-उपासिकांनी श्रद्धेने अष्टशील ग्रहण केले.

# महात्मा फुले हायस्कूलमध्ये 'स्वच्छ शाळा–सुंदर शाळा' अभियान



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव। प्रतिनिधी :** शासनाच्या निर्देशानुसार धरणगाव शहरातील सुवर्ण महोत्सवी महात्मा फुले हायस्कूलमध्ये शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजता 'स्वच्छ शाळा–सुंदर शाळा' उपक्रमांतर्गत 'एक दिवस स्वच्छतेसाठी' स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात शाळेची इमारत, वर्गखोल्या तसेच संपूर्ण शालेय परिसराची स्वच्छता करण्यात आली. मुख्याध्यापक जे. एस. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, आजी-माजी विद्यार्थी आणि पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या वेळी परिसरातील वृक्षांना विद्यार्थ्यांच्या हस्ते पाणी देण्यात आले. तसेच झाडांना खत देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक जे. एस. पवार म्हणाले, "परिसर स्वच्छ असेल तर मनुष्य निरोगी राहतो. स्वच्छ शाळा–सुंदर शाळा हा उपक्रम केवळ शाळेपुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची सवय आपल्या दैनंदिन जीवनातही अंगीकारावी." या उपक्रमात ज्येष्ठ शिक्षिका एम. के. कापडणे, पी. डी. पाटील, एच. डी. माळी, व्ही. पी. वऱ्हाडे, ग्रंथपाल गोपाल महाजन, एस. एन. कोळी, व्ही. टी. माळी, जीवन भोई यांच्यासह